# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई
# प्रेसनोट

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**2023 .**

**नवी मुंबई**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई.** **कक्ष -३** **दिनांक १३/०१/२०२३**

## अल्पवयीन मुलीस धमकावुन तिचेवर जबरीने बलात्कार करणा-या नराधमास गुन्हे शाखेने जेरबंद केले.

---

नवी मुंबई आयुक्तालयांतर्गत बालके तसेच महिलांविरुद्ध दाखल होणा-या गुन्हयांची गंभीरपणे दखल घेवून सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत मा. वरीष्ठांनी आदेश व सुचना दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हेशाखा कक्ष ३ कडून सदर प्रकारातील गंभीर अउघड गुन्हयांचा समांतर सुरु आहे.

दि. १४/१२/२०२२ रोजी नेरुळ पोलीस ठाणेकडे गु.रजि.नं. ४९१/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७६, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४ अन्वये अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाची माहिती प्राप्त झालेनंतर कक्ष-०३, गुन्हे शाखेकडून तात्काळ घटनास्थळी भेट देवून समांतर तपास सुरु करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने फिर्यादी व साक्षीदार यांनी तपासादरम्यान कथन केलेल्या वर्णनाप्रमाणे आरोपीबाबत मिळालेल्या माहितीचे तसेच तांत्रिक तपासाचे आधारे संशयीत आरोपीचा शोध सुरु होता. नमुद गुन्हयातील आरोपीची माहिती काढण्याकरिता सदर घटनास्थळ परिसरातील सुमारे ४० ते ५० ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करण्यात आलेले आहेत.

फिर्यादी व साक्षीदार यांनी तपासादरम्यान सदर गुन्हयातील आरोपी हा अज्ञात इसम असल्याची माहिती दिलेली होती. तसेच पोलीस असल्याचे सांगून अशा प्रकारचे गुन्हे करणारे मुंबई, नवी मुंबई, ठाणे व रायगड परिसरातील सुमारे १० ते १५ इसम पडताळले. अभिलेखावरील आरोपी नामे संतोष सर्जेराव नरवडे याची माहिती कक्ष ३ चे अधिकारी सपोनि ईशान खरोटे यांना प्राप्त झाली. कक्ष ३ गुन्हे शाखेच्या पथकाने मुंबई, नवी मुंबई व औरंगाबाद येथून गोपनिय व तांत्रिक पद्धतीने अत्यंत कौशल्यपुर्ण तपास करुन नमुद आरोपीची माहिती प्राप्त केली.

नमुद आरोपीनामे संतोष सर्जेराव नरवडे याचेबाबत कक्ष ३ यांना प्राप्त झालेल्या माहितीचे आधारे तपास पथकाने दि. ०६/०१/२०२३ रोजी त्यास अंधेरी परिसरातून ताब्यात घेतले. चौकशीमध्ये नमुद आरोपीचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाला. आरोपीतास गुन्हयाचा पुढील तपासकामी नेरुळ पोलीस ठाणे येथे हस्तांतरीत

करण्यात आले. आरोपीतास नेरुळ पोलीस ठाणे येथे अटक करण्यात आली व त्यास मा. न्यायालयाने १६/०१/२०२३ तारखेपर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केलेला आहे. पुढील गुन्हयाच्या तपासामध्ये गुन्हे शाखेच्या अधिका-यांनी व नेरुळ पोलीस ठाणे येथील तपास पथकाने एकत्रित केलेल्या सखोल चौकशीमध्ये आरोपीताने सदरचा गुन्हा कबूल केलेला आहे.

नमुद आरोपीत हा डिसेंबर २००८ मध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई पदावर भरती झाला होता. त्याचेविरुद्ध यापुर्वी एन आर आय सागरी पोलीस ठाणे गुरक्र. १०४/२०१४ भादंवि कलम ३६४(अ), ३८४ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळी त्याची नियुक्ती तळोजा पोलीस ठाणे येथे होती. या गुन्हयात त्यास अटक करण्यात आली होती. नमुद गुन्हयामध्ये तो सध्या जामिनावर मुक्त आहे. नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विभागीय चौकशीअंती समितीने त्यास पोलीस खात्यातून सन २०१७ मध्ये बडतर्फ केलेले आहे.

सदरचा गुन्हा नवी मुंबई पोलीस आयुक्त मा.श्री. मिलींद भारंबे, सह पोलीस आयुक्त, मा.श्री. संजय मोहिते, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.श्री. महेश घुर्ये यांच्या सुचनांप्रमाणे पोलीस उप आयुक्त, गुन्हे मा.श्री. अमित काळे व सहा. पोलीस आयुक्त , गुन्हे मा.श्री. विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा गुन्हा कक्ष ३ चे वपोनि शत्रुघ्न माळी व सपोनि ईशान खरोटे, सपोनि सागर पवार, पोउपनिरी सुशिल मोरे, पोहवा/९७४ मोरे, मपोहवा/५६ पवार, पोहवा/१८०६ पाटील, पोहवा/२०१६ पाटील, पोहवा/२०९१ जेजूरकर, पोहवा/२३८६ जोशी, पोना/२८३६ मोरे यांनी गुन्हयाचे तपासकामी महत्त्वपुर्ण कामगिरी करुन सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस आयुक्त तुर्भे विभाग मा.श्री.गजानन राठोड, नेरुळ पोलीस ठाणेचे वपोनि मा.श्री.तानाजी भगत व तपास पथक तपास करीत आहे.